Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी ( 20 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

खालील बटणांना क्लिक करून ऑनलाईन टेस्ट सोडवू शकता.

मराठी टेस्ट

गणित टेस्ट



इंग्रजी टेस्ट

सेमी गणित टेस्ट

प.अभ्यास-1 टेस्ट

प.अभ्यास-2 टेस्ट

## ८. गुणग्राहक राजा

टेस्ट सोडवा

# वाचा व समजून घ्या.

घेत गेलो.'' महाराज म्हणाले. त्यांनी पोरांना बसवलं. मिठाई खाऊ घातली.

पोरं घोडागाडीतून घरी परतली. त्यांच्या खेळाची आणि टोपीची गोष्ट मोहल्लाभर पसरली.

गजाननच्या शाळेत वार्षिक बक्षीस समारंभ होता. महाराजच बक्षीस समारंभासाठी आले होते. एक पोरगा पुन्हा पुन्हा वेगवेगळी बक्षिसं घेण्यासाठी येऊ लागला. अभ्यासात, चित्रकलेत, एवढंच काय हस्ताक्षर स्पर्धेतही तोच होता. अठरा बक्षिसं त्या पोरानं घेतली. महाराजांनी या गजानन माणिकला ओळखलं. त्याला बघून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, ''बघू तुझं हस्ताक्षर !''

गजाननं कागद-शाई मिळवली. कामटीचा बोरू केला. कागदावर लिहिलं –'श्रीमंत सयाजीराव महाराज की जय !' महाराजांनी त्याला जरीची टोपी बक्षीस दिली. विद्याधिकाऱ्यांकडे वळून ते म्हणाले, ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

हाच मुलगा पुढे बडोद्याचं राजरत्न गजानन माणिकराव झाला.

**– बाबा भांड**

**शब्दार्थ :** **देहभान विसरणे** – स्वतःची जाणीव विसरणे. **सूर** – सुरपारंबी या खेळातील काठी. **मोहल्ला** – गल्ली/शहराचा काही भाग. **बोरू** – बांबूपासून तयार केलेली लेखणी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुले कोणता खेळ खेळत होती ?
(आ) महाराजांनी गजाननला कोणते बक्षीस दिले ?
(इ) गजाननने कागदावर बोरूने काय लिहिले ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) थोड्या वेळानं महाराज ............... आले.
(आ) पोरं ............... घरी परतली.
(इ) ''बघू तुझं ............... !''

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''पोरं चपळ आहेत. विद्याधिकाऱ्यास सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा.''
(आ) ''झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले.''
(इ) ''काय नाव बाळांनो तुमचं ?''
(ई) ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांनी राणीसाहेबांना सुरपारंबीचा खेळ कसा दाखवला ?
(आ) गजाननने कशाकशात बक्षिसे मिळवली ?

वजाबाकी करा. सराव

**४. वजाबाकी**

टेस्ट सोडवा

२. उभी मांडणी करून वजाबाकी करा.

(१) ३२४५ – ११२७ (२) ६००७ – २३४५ (३) ६०३७ – ४०४३

(४) ४७५२ – २३८४ (५) ४००४ – ३१५६ (६) ८०४२ – ३१२९

(७) ६५२४ – २६५६ (८) ५३०५ – २१६९ (९) ६०५२ – २७६३

(१०) ८२३५ – ४१९२ (११) ४००० – ३९९९ (१२) ८०२० – ५४३२

**पाच अंकी संख्यांची बिनहातच्याची वजाबाकी**

◆ एका गावात जलसंधारणाच्या कामासाठी ८६,५७४ रुपये लोकवर्गणी जमा करण्यात आली. त्यांतून ७४,२५४ रुपये खर्च झाला. उरलेली रक्कम जलपुनर्भरणासाठी वापरण्याचे ठरले, तर जलपुनर्भरणासाठी किती रक्कम मिळाली ?

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | ८ | ६ | ५ | ७ | ४ |
| – | ७ | ४ | २ | ५ | ४ |
| | १ | २ | ३ | २ | ० |

एककाखाली एकक, दशकाखाली दशक,... याप्रमाणे मांडणी केली.

एककांतून एकक, दशकांतून दशक, शतकांतून शतक, हजारांतून हजार व दशहजारांतून दशहजार वजा केले.

जलपुनर्भरणासाठी १२,३२० रुपये रक्कम मिळाली.

**स्वाध्याय**

१. खालील उदाहरणे सोडवा.

(१)

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | १ | ७ | ४ | ३ | २ |
| – | १ | ४ | ३ | २ | १ |
| | | | | | |

(२)

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| – | १ | ३ | २ | ५ | ६ |
| | | | | | |

(३)

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | ५ | ९ | ३ | २ | ५ |
| – | ३ | ७ | १ | २ | ४ |
| | | | | | |

(४)

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | ३ | ८ | ९ | ७ | ६ |
| – | २ | ७ | ४ | ० | ५ |
| | | | | | |

२. उभी मांडणी करून वजाबाकी करा.

(१) १३९०८ – २७०५ (२) २३४५७ – ३४६

(३) ८५६७९ – ७४०५६ (४) ६९८७६ – ५४३२१

## 4. Subtraction

टेस्ट सोडवा

- subtract.

**Revision**

2. Arrange vertically and subtract.

(1) 3245 – 1127 (2) 6007 – 2345 (3) 6037 – 4043

(4) 4752 – 2384 (5) 4004 – 3156 (6) 8042 – 3129

(7) 6524 – 2656 (8) 5305 – 2169 (9) 6052 – 2763

(10) 8235 – 4192 (11) 4000 – 3999 (12) 8020 – 5432

### Subtraction of five-digit numbers without borrowing

- **In a village, ₹ 86,574 are collected through contributions for water conservation works. ₹ 74, 254 are spent. The remaining amount is to be used for ground water recharging. How much money remains for this work ?**

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 8 | 6 | 5 | 7 | 4 |
| – 7 | 4 | 2 | 5 | 4 |
| 1 | 2 | 3 | 2 | 0 |

Arrange the numbers in order, putting units under units, tens under tens, and so on.

Units are subtracted from units, tens from tens, hundreds from hundreds, thousands from thousands and ten thousands from ten thousands.

₹ 12,320 are available for ground water recharging.

**Exercise**

1. Subtract.

(1)

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 4 | 3 | 2 |
| – 1 | 4 | 3 | 2 | 1 |
| | | | | |

(2)

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| – 1 | 3 | 2 | 5 | 6 |
| | | | | |

(3)

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 3 | 2 | 5 |
| – 3 | 7 | 1 | 2 | 4 |
| | | | | |

(4)

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 3 | 8 | 9 | 7 | 6 |
| – 2 | 7 | 4 | 0 | 5 |
| | | | | |

2. Arrange vertically and subtract.

(1) 13908 – 2705 (2) 23457 – 346

(3) 85679 – 74056 (4) 69876 – 54321

टेस्ट सोडवा


## Listen and understand. Revision

**To the Market**

**Listen, repeat and read aloud.**
कविता ऐका, म्हणा आणि मोठ्याने वाचा.



**Child 1 :** I went to the market.
Do you know what I bought ?
***Some red shiny apples !***
That's what I got.




**Child 2 :** I went to the market.
Do you know what I bought ?
***Some red shiny apples !***
***A big loaf of bread !***
That's what I got.




**Child 3 :** I went to the market.
Do you know what I bought ?
***Some red shiny apples !***
***A big loaf of bread !***
***A pack of colour pencils !***
That's what I got.

**Child 4 :** ..............

*A string of white flowers*



*A bunch of big bananas*



*A big jar of honey*



*A sack of gram flour*




*A pack of liquid soap*




*Some juicy ripe mangoes*



*A pair of blue bangles*




- **Look at the pictures and words. Use them to add more lines to the poem. You may also make up more lines on your own.**

पाठ वाचा व समजून घ्या. **५. घरोघरी पाणी**

टेस्ट सोडवा

## गावाचा पाणीपुरवठा



तलाव, नद्या, धरणे हे आपले पाण्याचे स्रोत आहेत. आपल्या घरापासून हे स्रोत बऱ्याच अंतरावर असू शकतात. थेट तेथूनच पाणी घेण्यात अडचणी असतात. शिवाय त्यातील पाणी जसेच्या तसे घरात पिण्यासाठी वापरता येईल याची खात्री देता येत नाही.

म्हणून गावाजवळचा एखादा मोठा स्रोत पाहतात. कालवा किंवा मोठ्या जलवाहिनीच्या मदतीने सबंध गावासाठी एका ठिकाणी पाणी आणतात. तेथे ते पिण्यासाठी निर्धोक करतात. याला जलशुद्धीकरण म्हणतात. जलशुद्धीकरण केंद्रातून ते सर्वांना पुरवण्याची सोय करतात. याला जलवितरण म्हणतात.

## सांगा पाहू



पाणी भरलेल्या बादलीतून आपण पिचकारीत पाणी भरून घेतो. त्या वेळी पाणी वाहण्याची दिशा कोणती असते ?



## उंचावरील टाक्या

पाणी खालच्या दिशेने वाहते, हे आपल्याला माहीत आहे, परंतु पाणी वर चढवायचे असेल, तर जोर लावावा लागतो. त्यासाठी एखादे यंत्र वापरावे लागते. पाणी चढवण्यासाठी पंप वापरतात. पंप चालवण्यासाठी डिझेल किंवा वीज वापरतात.

विजेचा शोध लागण्यापूर्वी पाणी जास्त उंचीवर नेणे शक्य होत नव्हते. विजेवर चालणारे पंप वापरून पाणी कितीतरी उंचीपर्यंत पोहोचवता येते. त्यामुळे उंच टाक्यांमध्ये पाणी साठवता येते. तेथून ते लांब अंतरापर्यंत गावांना किंवा शहरांना पुरवता येते.



उंचावरील टाकी

जलशुद्धीकरण केंद्रातून बाहेर पडणारे पाणी घरोघरी

# ५. शिवरायांचे शिक्षण

टेस्ट सोडवा

## वाचा व स्वाध्याय सोडवा.

शहाजीराजांनी पूर्वतयारी करून दिली होती. त्यांनी शिवरायांना बंगळूरहून पुण्याला पाठवताना सामराज नीळकंठ पेशवे, बाळकृष्ण हनमंते मुजुमदार, माणकोजी दहातोंडे सरनोबत, रघुनाथ बल्लाळ सबनीस, सोनोपंत डबीर अशी मातब्बर मंडळी त्यांच्याबरोबर दिली होती. जणू हे सर्व स्वतंत्र राजाचे अधिकारीच. शिवरायांनी आपल्या जहागिरीचा कारभार उत्तम रीतीने पाहावा, म्हणूनच शहाजीराजांनी हे अधिकारी पुण्यास पाठवले होते. त्यांच्या मदतीने शिवराय जहागिरीचा कारभार पाहू लागले. लोकांच्या सुखदु:खाच्या गोष्टींकडे लक्ष देऊ लागले. रयतेवर अन्याय करणाऱ्यांना शिक्षा होऊ लागल्या. एक प्रकारे शहाजीराजांच्या जहागिरीचा कायापालटच होत होता. पुढे होऊ घातलेल्या स्वराज्याचा नमुनाच मावळ्यांना पाहायला मिळत होता. जणू तो स्वराज्याचा अरुणोदयच होता !

**शिवरायांचा विवाह :** त्या काळात अगदी लहानपणीच लग्न करण्याची पद्धत होती, तेव्हा जिजामाता म्हणाल्या,''आता शिवबाचे दोहोंचे चार हात करायला पाहिजेत.'' मग शिवबाकरिता मुली पाहणे सुरू झाले. एक मुलगी त्यांना पसंत पडली. तिचे नाव सईबाई. फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यातील ती मुलगी. हा विवाह मोठ्या थाटामाटाने साजरा झाला.

### स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शहाजीराजे ......... गाढे पंडित होते.

(संस्कृतचे, कन्नडचे, तमीळचे)

(आ) मावळात राहणाऱ्या लोकांना ........... म्हणतात.

(शेतकरी, सैनिक, मावळे)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांना शिकवण्यासाठी शिक्षकांची नेमणूक कोणी व कोठे केली ?

(आ) शिवरायांना शिक्षकांनी कोणत्या विद्या शिकवण्यास प्रारंभ केला ?

(इ) दादाजी कोंडदेवांनी शेतकऱ्यांना शेतसाऱ्याची सूट का दिली ?

**३. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पुण्याचे रूप कसे पालटले ?

(आ) शिवरायांना कोणत्या विद्या अवगत झाल्या ?

(इ) जिजाबाईंनी कोणता निश्चय केला होता ?

**उपक्रम**

(अ) जिजाबाई व शिवराय यांच्यामधील संवादाचे नाट्यीकरण करा.

(आ) वीरमाता जिजाबाईंचे चरित्र वाचा.

CHVQRJ

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here